Name - Aarya S. Pandit    Std - 8th    Topic - Marathi

- 1st Rank in Marathi Elocution.

~ वृध्दाश्रम ही खरच काळाजी गरज आहे का ? ~

नमस्कार,

सर्वप्रथम तर मला हे सांगताना अत्यंत अभिमान वाटत आहे की आमच्या घरात मी, माझे आई-बाबा, काका-काकू, त्यांचा लहान मुलगा म्हणजे माझा भाऊ, मम्मी आजी आणि आत्या आजी म्हणजे माझ्या वडिलांची आई आणि आत्या. असे आम्ही ८ जण राहतो. खूप मजा करतो. आणि त्यामुळे माझ्या अनुभवाने मी सांगू शकते की घरात वृध्द व्यक्ती असतील तर त्यांचे प्रेम, ज्ञान आणि अनुभव या मुळे कुटुंबातील वातावरण समृध्द होते. आजी-आजोबा कुटुंबाला एकत्र ठेवण्याचे काम करतात, भारतीय संस्कृतीत तर एकत्र कुटुंबपध्दतीला विशेष महत्त्व आहे. भारतीय समाजात कुटुंबाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे ज्येष्ठ व्यक्ती. त्यांनी आपल्या आयुष्यात कुटुंबासाठी अनेक त्याग केलेले असतात. त्यामुळेच त्यांचा मान ठेवणे आणि त्यांची काळजी घेणे ही आपली जबाबदारी आहे.

असे असले तरी, ते म्हणतात न, "प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात." तर आता आपण नाण्याची दुसरी बाजू पाहूयात, म्हणजे आपण हे समजून घेऊ वृध्दाश्रमाची संकल्पना कशी निर्माण झाली आणि का वाढत गेली. खरं तर वृध्दाश्रमाची संकल्पना ही परदेशातून आली आहे. विभक्त आणि छोटे कुटुंब त्यात दोघे पण कमवणारी. त्यामुळे वृध्द व्यक्तींकडे लक्ष देता येत नाही. यामुळे त्यांना आपल्या मुलांवर ओझे होण्याची भावना वाटू लागली तर काहींना कुटुंबाच्या ताणतणावामुळे घरात राहणे अवघड वाटू लागले. तर दुसरीकडे कामाच्या ताणतणावामुळे आणि व्यस्त जीवनशैली मुळे मनात नसले तरी आपल्या ज्येष्ठ पालकांना वृध्दाश्रमात ठेवावे लागते. खर तर वृध्द व्यक्तींना अनेक आरोग्य समस्या असतात, त्यामुळे त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे आणि त्यांची वैद्यकीय सेवा करणे हे फार गरजेचे आहे. वृध्दाश्रमात त्यांना त्यांच्या समान वयाच्या लोकांसोबत राहता येते

आणि त्यांचा एकटेपणा दूर होतो. ह्यामुळे वृद्धाश्रमांची आवश्यकता निर्माण झाली. आणि ह्या परिस्थितीचा विचार करता वृद्धाश्रम हा उत्तम पर्याय आहे.

पण हो हा उत्तम पर्याय असला तरी शेवटचा उपाय नाही. कारण वृद्ध व्यक्तींना केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक आधाराचीही गरज असते. त्यांच्यासोबत वेळ घालवणे, त्यांची विचारपूस करणे हे अत्यंत गरजेचे आहे. जाता जाता ~~३~~ एकच सांगावस वाटत, वृद्धाश्रम हा काही कारणामुळे शेवटचा पर्याय असला तरी फक्त वृद्धाश्रम हे कधीच नसाव.

धन्यवाद !